महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२७१३
दिनांक : २६ /०६/२०२१

# आदेश

विषय:- कोरोना विषाणू (कोविड - १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी " Levels of Restrictions for Breaking the Chain " प्रतिबंधात्मक आदेश.

संदर्भ:- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०,२१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०,३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०,३० सप्टेंबर २०२०,१४ ऑक्टोबर २०२०,२३ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०,२१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, १० फेब्रुवारी २०२१,१५ मार्च २०२१,१७ मार्च २०२१, २७ मार्च २०२१, ४ एप्रिल २०२१,१३ एप्रिल २०२१,२० एप्रिल २०२१, २१ एप्रिल २०२१, २९ एप्रिल २०२१,१२ मे २०२१,३० मे २०२१,४ जून २०२१,१० जून २०२१,१७ जून २०२१,२५ जून २०२१

५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०, २९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१,दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१, ८३०८,दि.२१.०२.२०२१, ८५७७,दि.२८.०२.२०२१, ९०५२,दि.१२.०३.२०२१, ९१४४, दि.१६.०३.२०२१, ९३११,दि.२०.०३.२०२१, ९५३१ दि.२६.०३.२०२१,९५४५, दि.२७.०३.२०२१, ५८, दि.०२.०४.२०२१, ८९, दि. ०५.०४.२०२१, ११३, दि. ०६.०४.२०२१, २४०, दि. ०९.०४.२०२१, ३००, दि. १४.०४.२०२१, ४०७, दि.१७.०४.२०२१, ४८९, दि. २०.०४.२०२१, ५२३, दि २२.०४.२०२१, ८३९, दि.३०.०४.२०२१, १२८०,दि.१४.०५.२०२१, १२८२ दि.१४.०५.२०२१, १७६५, दि.२८.०५.२०२१, १८१८ दि.३१.०५.२०२१, १९९० दि.०५.०६.२०२१, २१८५ दि.११.०६.२०२१, २३९३ दि.१८.०६.२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी राज्य शासनाने दि २५.०६.२०२१रोजी आदेश क्र DMU/2020/CR.92/DISM-1 अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार पुणे महानगरपालिका हद्दीत लेव्हल - ३ चे निर्बंध लागू राहतील.

ज्याअर्थी सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये** कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अत्यावश्यक सेवा ( Essential Category ) मधील नमूद दुकाने ही आठवड्यातील सर्व दिवस दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

२) अत्यावश्यक दुकाना व्यतिरिक्त इतर दुकाने ( Non-Essential Shops ) सोमवार ते शुक्रवार दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. शनिवार व रविवार पूर्णतः बंद राहतील.

३) मॉल, सिनेमागृह ( Single Screen and Multiplex ) नाट्यगृह, संपूर्णतः बंद राहतील.

४) रेस्टॉरंट, बार, फुड कोर्ट हे सोमवार ते शुक्रवार दुपारी ४.०० वाजेपर्यंत आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. दुपारी ४.०० नंतर तसेच शनिवार व रविवार फक्त पार्सल सेवा / घरपोच सेवा ( Home Delivery ) रात्री ११.०० पर्यंत सुरु राहील.

५) लोकल ट्रेन मधून फक्त वैद्यकीय सेवेसाठी, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी व महिलांसाठी , शासकीय कर्मचारी, विमानतळ सेवा ( Airport Services ), बंदरे सेवा ( Port Services ) यांच्या कर्मचाऱ्यांना प्रवास करणेस परवानगी राहील.

६) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणे ( उद्याने ), खुली मैदाने, चालणे व सायकलिंग आठवड्यातील सर्व दिवस सकाळी ०५.०० ते सकाळी ०९.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

७) सुट देण्यात येत असलेल्या आस्थापना / सेवा ( Exemption Category ) व्यतिरिक्त सर्व खाजगी कार्यालये कामाचे दिवशी ( working days ) ५०% कर्मचारी क्षमतेने दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

८) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अत्यावश्यक सेवा व कोविड-१९ व्यवस्थापनाशी संबंधित शासकीय कार्यालये ( Government Offices and Emergency Services required for Covid-19 Management ) १००% क्षमतेने सुरु राहतील.

शासकीय कार्यालये ( अत्यावश्यक / कोरोना विषयक कामकाज करणाऱ्या कार्यालयां व्यतिरिक्त ) ५०% अधिकारी / कर्मचारी उपस्थितीत सुरु राहतील. उपरोक्त कार्यालये / आस्थापना यांना यापेक्षा जास्त कर्मचारी उपस्थित असणे आवश्यक असल्यास संबंधित आस्थापना प्रमुख यांनी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी यांची परवानगी घ्यावी.

९) सर्व आउटडोअर स्पोर्ट्स ( outdoor games ) सर्व दिवस सकाळी ०५.०० ते ०९.०० या वेळेत सुरु राहतील.

१०) सामाजिक, धार्मिक कार्यक्रम व मनोरंजन कार्यक्रम यास ५० लोकांच्या उपस्थितीत सोमवार ते शुक्रवार दुपारी ०४.०० वाजपर्यंत परवानगी राहील.

- उपरोक्त कार्यक्रमाचा कालावधी हा ३ तासांपेक्षा जास्त असू नये
- सदर ठिकाणी खाद्यपदार्थचे सेवन करण्यास प्रतिबंध राहील.
- सदर कार्यक्रमात Covid Appropriate Behaviour ( CAB ) चे पालन करावे.
- आदेशाचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करावी. तसेच बारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनाचे परवाना रद्द करणे अथवा मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील.

११) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व धार्मिक स्थळे नागरिकांसाठी पूर्णपणे बंद राहतील. सदर ठिकाणी दैनंदिन पूजा / अर्चना करण्याकरिता परवानगी राहील.

१२) लग्न समारंभ कार्यक्रम जास्तीत जास्त ५० लोकांच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील. मे. शासनाने निर्गमित केलेल्या आदेशातील अटी / मार्गदर्शक सूचनांनुसार धार्मिक स्थळी विवाह संबंधित कार्यक्रम मर्यादित लोकांच्या उपस्थितीत करण्यास परवानगी राहील.

१३) अंत्यसंस्कार, दशक्रिया व त्यांच्याशी निगडीत कार्यक्रम जास्तीत जास्त २० लोकांच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील. मे. शासनाने निर्गमित केलेल्या आदेशातील अटी / मार्गदर्शक सूचनांनुसार धार्मिक स्थळी अंत्यविधीशी संबंधित कार्यक्रम मर्यादित लोकांच्या उपस्थितीत करण्यास परवानगी राहील.

१४) पुणे महानगरपलिका क्षेत्रामधील ज्या बांधकामाच्या ठिकाणी कामगारांची राहण्याची व्यवस्था आहे असे बांधकाम सुरु ठेवता येतील. तथापि, बाहेरून येणारे कामगार असल्यास असे बांधकाम दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यास परवानगी राहील. मात्र बाहेरून येणारे कर्मचारी हे दुपारी ०४.०० वाजता तेथून घरी जाण्यासाठी बाहेर पडतील.

१५) कृषी संबंधित दुकाने आणि त्यांच्याशी संबंधित आस्थापना ( बी-बियाणे, खते, उपकरणे व त्यांच्याशी निगडीत देखभाल व दुरुस्ती सेवा इत्यादी ) तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती मधील शेतमालाची विक्री करणारे दुकाने / गाळे हे आठवड्यातील सर्व दिवस दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

१६) ई – कॉमर्स सेवांना सर्व वस्तू व सेवा यांचा पुरवठा करण्याकरिता परवानगी राहील.

**१७) पुणे महानगरपालिका क्षेत्रात सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ५ पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास ( जमावबंदी ) प्रतिबंध राहील तसेच सायंकाळी ०५.०० नंतर ( अत्यावश्यक कारण वगळता ) संचारबंदी लागू राहील.**

१८) व्यायामशाळा ( Gym ), सलून, ब्युटी पार्लर, स्पा, wellness centers आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने पूर्व नियोजित वेळेनुसार ( by appointment ) दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. मात्र शनिवार व रविवार पूर्णतः बंद राहतील. सदर ठिकाणी वातानुकूल ( A.C ) सुविधा वापरता येणार नाही.

१९) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजिक वाहतूक व्यवस्था ( PMPML ) आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने ( without standing ) सुरु राहील.

२०) माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना व त्यामध्ये जास्तीत जास्त ३ व्यक्ती ( चालक + क्लीनर / मदतनीस ) यांना इतर प्रवाश्यांना लागू असलेल्या नियमानुसार प्रवास करणेस परवानगी राहील.

२१) खाजगी वाहनातून, बसेस तसेच लाब अंतराच्या रेल्वे मधून अंतर जिल्हा प्रवास करण्यास परवानगी राहील. मात्र सदर वाहने शासनाने घोषित केलेल्या लेवल ५ मधिल ठिकाणी थांबणार असतील तर e-pass असणे बंधनकारक राहील. अशावेळी वाहनामधून प्रवास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी स्वतंत्र e-pass आवश्यक राहील.

२२) Export oriented units ( including MSMEs that need to fulfill export obligation ) मधिल उत्पादन नियमितपणे सुरु राहील.

२३) खालील उत्पादन क्षेत्र / उद्योग नियमितपणे सुरु राहतील.

अ) अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग ( Essential goods manufacturing units ) – ( अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना लागणारा कच्चा माल उत्पादन करणारे युनिट, त्याची पॅकेजिंग करणारे युनिट आणि संपूर्ण पुरवठा साखळी यासह ).

ब) सतत प्रक्रिया करणारे उद्योग ( All continuous process industries ) – ( Units that require process that are of such a nature that these cannot be stopped immediately and cannot restart without considerable time requirement )

क) राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षणाशी संबंधित उत्पादन करणारे उद्योग. ( Manufacturing of items that are significant to National Security and Defence )

ड) Data Centers/Cloud Service providers/ IT Services supporting critical infrastructure and services.

२४) उपरोक्त मुद्दा क्र २२ व २३ येथे नमूद केलेल्या उद्योगांव्यतिरिक्त इतर सर्व उत्पादन क्षेत्र हे ५०% कर्मचारी क्षमतेने सुरु राहतील. कर्मचारी ने-आण कण्यासाठी संबंधित उद्योगांनी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था करावी. सदर कर्मचाऱ्यांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास करता येणार नाही.

२५) उपरोक्त आदेशामध्ये परवानगी देण्यात आलेल्या ज्या अस्थापना दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी तसेच त्या ठिकाणावरून सेवा घेणारे नागरिक यांनी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत त्यांचे घरी पोहोचणे अपेक्षित आहे.

२६) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था यांचे नियमित वर्ग दिनांक १५ जुलै २०२१ पर्यंत पूर्णतः बंद राहतील. सर्व प्रकारचे कोचिंग क्लासेस, प्रशिक्षण संस्था पूर्णतः बंद राहतील. मात्र ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील.

- मात्र कोविड-१९ चे व्यवस्थापनाकरिता वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत Skill Development प्रशिक्षण कोर्सेस सुरु राहतील. त्यांनी Covid Appropriate Behaviour ( CAB ) चे पालन करावे.

२७) मद्य विक्रीची दुकाने सोमवार ते शुक्रवार दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. शनिवार व रविवार Home Delivery सुविधा सुरु राहील.

२८) सदर आदेश हे पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येणाऱ्या पुणे कटक मंडळ व खडकी कटक मंडळ यांना देखील लागू राहतील.

२९) मे. शासनाने व इकडील कार्यालयाकडील संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

३०) सदरचे आदेश हे पुणे महानगरपालिका क्षेत्रातील कोविड-१९ सरासरी पॉझिटीव्हीटी दर व ऑक्सिजन बेड ऑक्यूपन्सी यांचे टक्केवारीनुसार शासनाने निश्चित केलेल्या लेवल विचारात घेऊन केलेले आहेत. जर त्यामध्ये वाढ / कमी झाल्याचे आढळून आल्यास याबाबत आढावा घेऊन सुधारित आदेश निर्गमित केले जातील

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि.२८.०६.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.२६.०६.२०२१ रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५० EST.1950

स्वाक्षरी/xxx
( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

निर्गमित

( सुनिल इंदलकर )
उप आयुक्त ( सामान्य प्रशासन )
पुणे महानगरपालिका

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management,**
**Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 25th June , 2021**

**ORDER**

**Levels of Restrictions for SAFE MAHARASHTRA**

---

**Reference:**

1.The Epidemic Diseases Act, 1897.
2. The Disaster Management Act, 2005
3. Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation Department Order

**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 4th June , 2021**

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee has vide various orders imposed restrictions in the State to break the chain of transmission of the COVID 19 virus from time to time;

And whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra continues to be threatened with the spread of COVID-19 virus;

And whereas post above referred order dated 4th June, 2021, new variants like *delta, delta plus* etc. have come to spread and are fuelling the potentiality of imminent (4-6 weeks), more severe third wave with wider geographical area;

And whereas INSACOG (a consortium of laboratories for Whole Genome Sequencing in the context of Covid 19 pandemic) has intimated that Delta Plus Variant is currently a Variant of Concern (VOC) with following characteristics:

1. Increased transmissibility
2. Stronger binding to receptors of lung cells
3. Potential reductions in monoclonal antibody response;

And whereas this VOC has been found in Maharashtra - in Ratnagiri, Jalgaon and other districts - requiring stricter restrictions in general to contain the spread of this virus;

And whereas these mutations to the virus and its continual evolution mean that unforeseen situations may unfold requiring wider and stricter restrictions, though current indices taken into account for imposing administrative level restrictions may indicate so and thus state level triggers other than Oxygen Beds Occupancy at state level need to be promulgated;

And whereas feedback and experience with not so satisfactory CAB compliance by public at large as well as deliberations of Task Force created for recommendation on Covid Treatment Protocols require revising the said order;

Now therefore, in exercise of the powers conferred under provisions of The Disaster Management Act, 2005, following modifications/ alternations and additions to the above referred order dated 4th June, 2021 are hereby promulgated for compliance by all.

1. **State Level Triggers:** Given that the virus causing Covid 19 is undergoing mutations in various geographies and that these mutations are displaying more transmissibility and potential reductions in monoclonal antibody response, a State Level Trigger mandating all the administrative units, irrespective of values of the indices of weekly positivity rate and oxygen bed occupancy percentage to remain at a level not below 3 is to be in operation till withdrawn by specific order of SDMA.

2. **Weekly Positivity Rate:** Weekly positivity rate to be considered for decision regarding levels of restrictions to be applied must be determined only on the basis of RT-PCR tests and not RAT or other tests. Data for this shall be made available by Public Health Department.

3. **Declaration Process for Levels of Restrictions to be followed by DDMA:** DDMA shall take data from Public Health Department and shall decide the level of restrictions that maybe followed in various administrative units under their jurisdiction subject to any State Level Trigger in operation. Above referred order of 4th June, 2021 gives the base level, subject to State Level Triggers, that they must adhere to as a minimum. However, as mentioned in the section VI of the above referred order of 4th June, 2021 DDMA may decide to impose higher level of restrictions or further restrictions with the same base level of restrictions. DDMA shall not require prior permission of SDMA for going for higher level of restrictions or putting extra restrictions.

4. While coming down onto a lower level, DDMA shall look into two weeks' trend before accepting lower level of restrictions. When there is an upward trend in number of positive cases being identified daily and requiring a higher level of restrictions than the current one, DDMA however shall do so without waiting for two weeks' trends.

5. DDMA shall take following special actions in addition to ensure ease of restrictions do not lead to spread of Covid 19:

   1. Push vaccination through public awareness activities; Attempt must be to achieve vaccination of 70% of eligible population at the earliest; encourage work place vaccinations especially of blue collar workers;

   2. Push Test-Track-Treat methodology to contain the spread,

3. Enforce on establishments to ensure safe work spaces with proper air ventilation norms using neither hepa filters or proper exhaust fans due to airborne droplet nature of the virus,

4. Carry out large number of tests and percentage of RT-PCR tests vis-a-vis other tests must be as expected by Public Health Department,

5. Impose fines effectively on violators of Covid Appropriate Behaviour,

6. Avoid events/ functions/ activities that lead to crowding, congregations and gatherings,

7. Declare containment zones judiciously so that restrictions are imposed on a smaller area, especially defaulting area,

8. Make flying squads for enforcement of CAB, especially to check high incidence events like marriages and establishments like restaurants, malls etc. It must be appreciated that CAB compliance is a must for lowering restrictions that are nothing but social level desperate measures in case of failure of this compliance by individual citizens.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

(Sitaram Kunte)
Chief Secretary

| | नवी मुंबई महानगरपालिका | NAVI MUMBAI MUNCIPAL CORPORATION |
|---|---|---|
| | पामबीच जंक्शन, भुखंड क्र.1 सेक्टर.15, सी.बी.डी, बेलापूर नवी मुंबई -400 614 दुरध्वनी क्रमांक : 2756 7181 /60 /61 | Palm Beach Junction, Plot No. 1 Sector-15 A, C.B.D., Belapur NAVI MUMBAI - 400 614 |

अत्यंत महत्वाचे / तातडीचे

जा.क्र.नमुंमपा/आ.व्य/ 336 /2021.
दिनांक : 26 / 06 / 2021

# आदेश

**विषय : कोविड-19 मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये "Levels of Restrictions for SAFE MAHARASHTRA" अंतर्गत निर्बंधाबाबत.**

**संदर्भ :**
1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005.
2) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम,1897
3) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 04 जून 2021.
4) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./300/2021, दिनांक 11/06/2021.
5) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./319/2021, दिनांक 18/06/2021.
6) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 25 जून 2021.
7) जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील जा.क्र.जिकाठा/जि.आ.नि.कक्ष/ Break the chain-4/21, दि.25/06/2021 रोजीचे आदेश.

**ज्याअर्थी,** राज्य शासनाने उक्त संदर्भ क्र.3 अन्वये पॉझिटिव्हिटी रेट व ऑक्सिजन बेड ऑक्युपन्सी या प्रमाणावर आधारित विविध आर्थिक व सामाजिक ॲक्टिव्हिटीज विचारात घेऊन 05 स्तर (05 Levels) जाहीर केले आहेत. आणि

**ज्याअर्थी, "Levels of Restrictions for Break The Chain"** अंतर्गत राज्य शासनाने उक्त संदर्भ क्र.3 अन्वये आदेश पारित केलेले आहेत. सदर आदेशास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत उक्त संदर्भ क्र.5 च्या आदेशान्वये नवी मुंबई क्षेत्रामध्ये पॉझिटिव्हिटी रेट व ऑक्सिजन बेड ऑक्युपन्सी या प्रमाणावर आधारित विविध आर्थिक व सामाजिक ॲक्टीव्हिटीज विचारात घेता Levels of Restrictions for Break The Chain अंतर्गत "स्तर -2 (Level-2)" नुसार दि. 21 जून, 2021 रोजी सकाळी 7.00 पासून ते दि. 28 जून 2021 सकाळी 7.00 पर्यंत सुधारित निर्बंध लागू करण्यात आलेले आहेत. आणि

**ज्याअर्थी,** कोरोना विषाणूची तिसरी संभाव्य लाट विचारात घेता राज्य शासनाने उक्त संदर्भ क्र.6 च्या आदेशानुसार **"Levels of Restrictions for SAFE MAHARASHTRA"** अंतर्गत राज्यात कठोर निर्बंध लागू करण्याच्या उद्देशाने "निर्बंध स्तर (Restriction Level)" लागू करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. आणि

**ज्याअर्थी,** उक्त संदर्भ क्र.7 च्या आदेशानुसार व मागील आठवड्यातील नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पॉझिटिव्हिटी रेट व ऑक्सिजन बेड ऑक्युपन्सी या प्रमाणावर आधारित विविध आर्थिक व सामाजिक ॲक्टीव्हिटीज विचारात घेता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे यांनी Levels of Restrictions for Break The Chain अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा समावेश "निर्बंध स्तर- 3 (Restriction Level-3)" मध्ये असल्याचे घोषित केले आहे.

**त्याअर्थी**, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील COVID-19 चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता, साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 च्या कलम 2 अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या सर्व संबंधित तरतूदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन, **मी अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, या आदेशान्वये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये Levels of Restrictions for SAFE MAHARASHTRA अंतर्गत "निर्बंध स्तर- 3 (Restriction Level- 3)" नुसार दि. 28 जून, 2021 रोजी सकाळी 7.00 पासून ते दि.05 जुलै 2021 रोजी सकाळी 7.00 पर्यंत खालील निर्बंध लागू राहतील, असे जाहीर करीत आहे.**

1. सर्व अत्यावश्यक सेवांची दुकाने सायंकाळी 4.00 वा. पर्यंत सुरु राहतील.
2. अत्यावश्यक सेवांव्यतिरिक्त इतर वस्तूंचा व्यवहार करणाऱ्या आस्थापना सोमवार ते शुक्रवार सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. शनिवार व रविवार सदर आस्थापना पूर्णपणे बंद राहतील.
3. मॉल्स / सिनेमागृहे (मल्टीप्लेक्ससह सिंगल स्क्रिन)/ नाट्यगृहे इ. पूर्णपणे बंद राहतील.
4. रेस्टॉरंन्टस् सोमवार ते शुक्रवार एकूण आसन क्षमतेच्या 50% क्षमतेने सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. मात्र, सोमवार ते शुक्रवार सायंकाळी 4.00 वा. नंतर तसेच शनिवार आणि रविवार फक्त टेक अवे / पार्सल सर्व्हिस आणि होम डिलेव्हरी सेवा सुरु राहील.
5. सार्वजनिक ठिकाणे/ खुली मैदाने/ वॉकिंग/ सायकलिंग दररोज सकाळी 5.00 वा. पासून सकाळी 9.00 वा. पर्यंत सुरु राहतील. मात्र सकाळी 9.00 नंतर सदर बाबीस प्रतिबंध राहील.
6. खाजगी कार्यालये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सायं.4.00 वाजेपर्यंत (सूट देण्यात आलेली कार्यालये वगळून) सुरु राहतील.
7. कार्यालयीन उपस्थिती- शासकीय कार्यालयासह परवानगी असणारी खाजगी कार्यालये 50% क्षमतेने सुरु राहतील.
8. क्रीडा- सकाळी 5.00 वा. पासून सकाळी 9.00 वा. पर्यंत फक्त मैदानी खेळांना परवानगी राहील.
9. चित्रीकरण Bubble झोनच्या क्षेत्रात सुरु राहील. सायं. 5.00 नंतर हालचालीस प्रतिबंध राहील.

10. सामाजिक / सांस्कृतिक / मनोरंजनपर कार्यक्रम 50% आसन क्षमतेने सोमवार ते शुक्रवार सायं 4.00 वा. पर्यंत करता येतील.
11. लग्न समारंभ केवळ 50 लोकांच्या मर्यादेतच करता येईल.
12. अंत्यसंस्कार विधी केवळ 20 लोकांच्या मर्यादेतच करता येईल.
13. बांधकामाकरीता केवळ साईटवर मजुर राहणाऱ्या ठिकाणी अथवा सायंकाळी 4.00 वा. पर्यंत कामगारांनी कामाचे ठिकाण सोडले पाहिजे या अटीवर परवानगी राहील.
14. कृषि विषयक सेवा दुकाने परवानगी दिलेल्या वेळेत सुरु राहतील.
15. ई-कॉमर्स- साहित्य व सेवा नियमित सुरु राहतील.
16. जमावबंदी सायं.5.00 वा. पर्यंत व संचारबंदी सायं 5.00 वा. नंतर लागू राहील.
17. व्यायामशाळा/ केश कर्तनालय /ब्युटी सेंटर्स / स्पा/ वेलनेस सेंटर्स सायं 4.00 पर्यंत एकुण क्षमतेच्या 50% क्षमतेने सुरु ठेवणेस परवानगी राहील. परंतू, ग्राहकांना पूर्वनियोजित वेळ घेऊनच (Prior Appointment Basis) यावे लागेल. वातानुकूलन यंत्रणेचा वापर करता येणार नाही.
18. सार्वजनिक परिवहन सेवा 100% बैठक क्षमतेने सुरु राहतील. परंतू, प्रवाशांना उभे राहून प्रवास करता येणार नाही.
19. मालवाहतूक जास्तीत जास्त 3 व्यक्तींसह (वाहन चालक / हेल्पर / क्लिनर इ.) लागू असलेल्या सर्व नियमांसह नियमितपणे सुरु राहील.
20. खाजगी कार / टॅक्सी / बस लांब पल्ल्याच्या गाड्यांव्दारे प्रवासासाठी (आंतर जिल्हा प्रवासासाठी स्तर 5 मधील कोणत्याही भागाकडे जात असल्यास किंवा त्या भागातून जात असल्यास व त्या भागामध्ये थांबा असल्यास, प्रवाशाकडे ई-पास असणे बंधनकारक राहील) नियमितपणे परवानगी राहील.
21. उत्पादन निर्यातीचे बंधन पूर्ण करण्याची आवश्यकता असलेल्या एमएसएमईसह निर्यात करणारे युनिट नियमितपणे सुरु राहतील.
22. उत्पादनाच्या अनुषंगाने :

    1. अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे युनिट (आवश्यक वस्तू आणि कच्चा माल / पॅकेजिंगचे उत्पादन करणारे घटक म्हणून वर्गीकृत केलेल्या वस्तू व आवश्यक असलेल्या पुरवठ्याच्या साखळीसह)
    2. सतत प्रक्रिया सुरु असणारे उद्योग (तात्काळ बंद न करता येणारे व मर्यादीत वेळेमध्ये सुरु करता न येणारे सर्व युनिट्स)
    3. राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी महत्वपूर्ण असलेल्या वस्तूंचे उत्पादन
    4. अत्यावश्यक, गंभीर स्वरुपाच्या पायाभूत सेवा सुविधा देणारे डेटा सेंटर / क्लाऊड सेवा देणारे प्रदाता/ आयटी सेवा नियमित सुरु राहतील.

25. उत्पादन क्षेत्रातील इतर सर्व उत्पादन युनिट, जे अत्यावश्यक सेवेत समाविष्ट केलेले नाहीत, परंतू निरंतर चालू ठेवणे आवश्यक आहे किंवा निर्यातक्षम आहेत, असे युनिट केवळ 50% कर्मचारी क्षमतेने व हालचाल ट्रान्सपोर्ट बबलने मर्यादीत अशा प्रकारे सुरु राहतील.

उक्त आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती / संघटना / संस्था यांचेवर साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 51 ते 60 अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता यामधील कलम 188 अन्वये कारवाई केली जाईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

: 26/06/21

**( अभिजीत बांगर)**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

प्रत :

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य. अधिकारी.
4. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
5. मा. पोलीस आयुक्त, नवीमुंबई.
6. जिल्हाधिकारी, ठाणे.
7. अतिरिक्त आयुक्त -1 आणि 2 नमुंमपा.
8. उप आयुक्त (मुख्यालय) आणि उप आयुक्त- परिमंडळ 1 व 2, नमुंमपा.
9. वैदयकिय आरोग्य अधिकारी, नमुंमपा.
10. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी (सर्व 8 विभाग कार्यालय), नमुंमपा.